# ४. वाक्प्रचार

विद्यार्थी मित्र-मैत्रिणींनो,

म्हणी आणि वाक्प्रचार हे तर कोणत्याही भाषेत आढळतात. ते म्हणजे भाषेचे अलंकारच आहेत जणू.

आपल्याला हे ठाऊकच आहे की भाषा आधी बोलल्या जातात, नंतर त्या लिपिबद्ध होतात, म्हणजे लिहिल्या जातात.

बोलता बोलता माणसे सहजपणे मनातला आशय व्यक्त करण्यासाठी वक्रोक्तीचा वापर करतात, म्हणजे आडवळणाने बोलतात. कधी विशिष्ट घटनांचा, वस्तूंचा संबंध जोडून वेगळेच काही सुचवायचा प्रयत्न करतात. अशावेळी 'वाक्प्रचार' किंवा 'म्हणी' निर्माण होतात. हे दोन्ही शब्दही पहा. 'वाणी'शी त्यांचा संबंध आहे. याचाच अर्थ बोलता बोलता आपोआप त्या निर्माण झाल्या आहेत.

पुढे काही वाक्प्रचार दिले आहेत. शब्दार्थ आणि उलट अर्थाचे शब्द जसे उलट-सुलट पद्धतीने अभ्यासले तसाच वाक्प्रचारांचाही अभ्यास आवश्यक आहे. हा अभ्यास अधिक पक्का करण्यासाठी या आवृत्तीत आम्ही काही वाक्प्रचारांचे वाक्यांत उपयोगही करून दाखवले आहेत. यामुळे तुमचा अभ्यास अधिक पक्का होईल.

## अं

**अंग काढणे** – एखाद्या कार्यातून आपला संबंध काढून घेणे.

**अंकित करणे** – पूर्ण ताब्यात घेणे, दुसऱ्याच्या अधीन असणे.

**अंग घेणे** – लठ्ठ होणे.

**अंग चोरणे** – अगदी थोडे काम करणे; कामात कुचराई करणे.

**अंग झडणे** – रोडावणे, कृश होणे.

**अंग झाकणे** – एखाद्या कार्याशी असणारा आपला संबंध उघड न करणे.

**अंग झाडणे** – झिडकारणे; नाकबूल करणे; जबाबदारी झटकणे, अव्हेरणे.

**अंग धरणे** – बाळसे घेणे, तब्येत सुधारणे, रुजणे.

**अंग मोडून काम करणे** – अतिशय कष्ट करून एखादे काम करणे.

**अंग मोडून येणे** – ताप येण्यापूर्वी कसकसणे.

**अंग मुरडणे** – दिमाख दाखविणे, तोरा दाखविणे.

**अंगदशिष्टाई करणे** – मध्यस्थी करणे.

**अंग सावरणे** – तोल सावरणे.

**अंगाई गाणे** – बाळाला झोपविणे.

**अंगाचा तिळपापड होणे** – रागाने फणफण करणे.

**अंगाचा भडका उडणे** – खूप संतापणे.

**अंगाचा मळ काढणे** – क्षुल्लक गोष्ट मिळवणे.

**अंगाचे पाणी पाणी होणे** – फार कष्ट करणे.

**अंगाची लाही लाही होणे** – संतापाने लाल होणे.

**अंगात त्राण न उरणे** – शक्ती नाहीशी होणे

**अंगापेक्षा बोंगा मोठा** – नाकापेक्षा मोती जड असणे.

**अंगाबाहेर टाकणे** – कामाशी असलेला आपला

● **अंगापेक्षा बोंगा मोठा**

दुकानात मिळणारे हवा भरलेले खाऊचे मोठे पुडे म्हणजे **अंगापेक्षा बोंगा मोठा** याचे उत्तम उदाहरण असतात.

● **अंगावर घेणे**

सिंहगडची मोहीम **अंगावर घेऊन** तानाजीने आपल्या मुलाचं-रायबाचं लग्न पुढे ढकललं.

---

## अ

**अ-वागणे** – वाईट मार्गास लागणे.

**अक्काबाईचा फेरा येणे** – अतिशय दारिद्र्यावस्था येणे.

**अक्कल खर्चणे** – खूप विचार करणे.

**अक्कल गुंग होणे** – काहीही न सुचणे, मती गुंग होणे, बुद्धी न चालणे.

**अक्कल जाणे** – बुद्धी नाहीशी होणे, काहीही न सुचणे, विचार न करता कृती करणे.

**अक्कल पुढे धावणे** – बुद्धीचा योग्य प्रकारे वापर न करणे.

**अक्कल मिळकत खाणे** – दुसऱ्याचे ऐकून वागणे, दुसऱ्याच्या विचाराप्रमाणे वागणे, बोलणे.

**अक्कल विकत घेणे** – अनुभवातून आलेले शहाणपण.

**अक्कल सांगणे** – शहाणपण शिकविणे, चांगल्या गोष्टी सांगणे.

**अकलेचा खंदक** – मूर्ख, बेअकली माणूस, विचार न करता काम करणारा.

**अकलेचा कांदा असणे** – बुद्धी न वापरता वागणे.

**अकलेचे तारे तोडणे** – ताळमेळ नसणारे बोलणे, अविचाराने बडबड करणे.

**अकरावा गुरू होणे** – भाग्य उजळणे.

**अकरावा रुद्र असणे** – अतिशय तापट स्वभाव असणे.

**अकसारणे** – प्रसिद्ध होणे.

**अकांडतांडव करणे** – रागाने आदळआपट करणे, रागाने विनाकारण आरडाओरडा करणे.

**अक्रीताचा व्यवहार** – भ्रष्ट व्यवहार करणे, नुकसानकारक व्यवहार करणे.

**अखेर होणे** – मरण पावणे.

**अखेरी मारणे** – शेवटचा डाव जिंकणे.

**अगडीदगडी जीव घालणे** – अडचणीत येणे.

**अगा बांधणे** – तर्क काढणे.

**अग्निकांड घडविणे** – कपटाने आग लावणे, लावालावी करणे, आगीत तेल ओतणे.

**अग्निकाष्ठ भक्षणे** – स्वतःस जाळून घेणे.

**अग्निदिव्य करणे** – कठीण कसोटीस उतरणे. आपले निर्दोषत्व सिद्ध करण्यासाठी अलौकिक अशी कृती करणे.

**अग्नि देणे** – मृतदेह पेटविणे, सरणावरील मृतदेहास पेटविणे.

**अग्निप्रवेश करणे** – सती जाणे, स्वतःस जाळून घेणे.

**अग्निसात होणे** – आगीत नष्ट होणे.

**अघळपघळ बोलणे** – उगाच बडबड करणे.

**अचंबा वाटणे** – चकित होणे.

**अचकल मिचकल खाणे** – काहीही खाणे.

**अचांगीने बोलणे** – चुकीचे बोलणे.

**अजमाईसीस येणे** – अनुभवास येणे, प्रत्ययास येणे, लक्षात येणे.

**अटकेवर झेंडा लावणे** – मोठा पराक्रम गाजविणे.

**अट घालणे** – शर्त घालणे.

**अठरा विसवे दारिद्र्य असणे** – अतिशय दारिद्र्य असणे.

**अडक्याची भवानी असणे** – क्षुल्लक असणे.

**अडणीवरचा शंख असणे** – निरुपयोगी असणे.

**अडकित्त्यात सापडणे** – दोन्हीकडून संकटात सापडणे.

माणसाचे **अध:पतन होत नाही.**

• **अन्नत्याग करणे**

**अन्नत्याग करून प्राणार्पण करण्याचा** मार्ग स्वातंत्र्यवीर सावरकरांनी स्वीकारला.

## आ

**आंगवणे** – नवस करणे.

**आंदकणे** – नाउमेद होणे.

**आंतरिक आच असणे** – मनातील इच्छा असणे.

**आंबटशौक करणे** – भलत्यासलत्या चैनी करणे.

**आईमाई करणे** – गयावया करणे, मनधरणी करणे.

**आकांत करणे** – रडून आरडाओरडा करणे.

**आकारास येणे** – मार्गास लावणे.

**आकाश ठेंगणे होणे** – गर्वाने फुगून जाणे.

**आकाश पाताळ एक करणे** – फार आरडाओरड करणे, क्षोभ किंवा कल्लोळ करणे, प्रयत्नाची पराकाष्ठा करणे.

**आकाश फाटणे** – चोहोबाजूने संकटे येणे.

**आकाशाची कुऱ्हाड कोसळणे** – परमेश्वराची अवकृपा होणे, सर्व बाजूंनी संकटे येणे.

**आकाशाला गवसणी घालणे** – अशक्य गोष्ट साध्य करण्याचा प्रयत्न करणे.

**आकाशाला झेंडा लावणे** – फार मोठा पराक्रम करणे.

**आकाशाला ठिगळ लावणे** – फार मोठ्या संकटाला धैर्याने तोंड देणे.

**आखाड्यात उतरणे** – विरोधकाशी सामना देण्यास तयार होणे.

**आखूडशिंगी बहुदुधी** – सर्व चांगल्या गोष्टी एकत्र असणे.

**आखाड्यात उतरणे** – एखाद्या वादास किंवा संघर्षास सिद्ध होणे, दोन हात करण्यास तयार होणे.

**आख्यान मांडणे** – कंटाळवाणे कथन करणे.

**आग ओकणे** – रागाने फटकळ बोलणे.

**आग पाखडणे** – शिव्यांचा वर्षाव करणे, राग... मोठ्या आवाजात बोलणे.

**आगीत उडी घालणे** – एखादे संकट ओढवून घे...

**आगीत तेल ओतणे** – भांडण विकोपास जाई... अशा तऱ्हेने भर घालणे.

**आगीतून निघून फुफाट्यात पडणे** – ए... संकटातून दुसऱ्या संकटात सापडणे.

**आघाडीवर असणे** – पुढे असणे.

**आघाडी साधणे** – वेळ साधणे.

**आटापिटा करणे** – प्रयत्नांची पराकाष्ठा करणे.

**आटे ढिले होणे** – अतिश्रमाने अंगी त्राण न उर...

**आडपडदा न ठेवणे** – मनमोकळेपणाने आपल्या... सर्व गोष्टी सांगणे.

**आडवा पालव घालणे** – एखादे कृत्य गुप्त... करणे.

**आडव्यात शिरणे** – मुख्य मुद्दा सोडून भलते... बोलणे.

**आड–विहीर जवळ करणे** – आत्महत्या करणे.

**आडवे घेणे** – एखादी गोष्ट सरळ–सरळ असताना देखील त्यात व्यंग काढणे.

**आडवे येणे** – कार्यात अडथळा आणणे.

**आडात सोडून दोर कापणे** – विश्वासघात... करणे.

**आडून गोळी मारणे** – दुसऱ्यामार्फत कार्य साधून घेणे.

**आढेवेढे घेणे** – एखाद्या गोष्टीला एकदम तयार न... होणे.

**आतड्याला पीळ पडणे** – कळकळ वाटणे... काळजाला पाझर फुटणे, दयेने कळवळणे.

**आतडे तुटणे** – जीव कळवळणे.

**आत्मा थंड करणे** – मन तृप्त होणे, करणे.

**आत्मसात करणे** – पूर्णपणे माहिती करून घेणे.

**आधाधिणे** – भीती वाटणे.

– वाक्यात उपयोग –

- **ईप्सित साधणे** – आपले काम आपण योग्य रीतीने करत राहिल्यास **ईप्सित साधतेच.**

## उ

**उंटावरचा शहाणा** – बेजबाबदारपणे मूर्खपणाची सल्लामसल्लत देणारा.
**उंटावरून शेळ्या हाकणे** – शहाणपणाने दूर राहून एखादे काम करण्यासाठी इतरांना उपदेश करणे.
**उंबरठे झिजवणे** – हेलपाटे मारणे.
**उंबराचे फूल** – क्वचित भेटणारी व्यक्ती, दुर्मीळ गोष्ट.
**उकळ्या फुटणे** – अनुकूल प्रवृत्ती होणे; मनोमन आनंद घेणे.
**उकिरडे फुंकणे** – अत्यंत हीन गोष्ट करणे.
**उखळ पांढरे होणे** – वैभव प्राप्त होणे
**उखाळ्यापाखाळ्या काढणे** – एकमेकांचे दोष काढणे
**उगीदुगी करणे** – मध्ये-मध्ये बोलणे
**उघडा पडणे** – निराधार होणे
**उचंबळून येणे** – भावना अनावर होणे
**उच्चाटन करणे** – नष्ट करणे
**उचल खाणे** – एखादी गोष्ट करण्यास प्रवृत्त होणे एकाएकी कामाला लागणे
**उचलबांगडी करणे** – हाकलून देणे, कामावरून कमी करणे, एखाद्याला त्याच्या मनाविरूद्ध दुसरीकडे नेणे
**उचलून गोष्ट सांगणे** – विरोध करणे, दर्शवणे
**उच्छाद मांडणे** – भंडावून सोडणे, त्रास देणे
**उजेड पाडणे** – मोठे काम करणे, यश मिळविणे, खूप कर्तबगारी दाखवणे
**उट्टे काढणे** – सूड घेणे
**उडत्या पाखराची पिसे मोजणे** – अत्यंत अवघड काम चतुराईने करून दाखविणे
**उणे उत्तर देणे** – अपमानकारक जबाब देणे, उलटून बोलणे
**उजवा हात असणे** – अत्यंत विश्वासू व तत्पर मदतनीस असणे
**उतराई होणे** – उपकारांची फेड करणे
**उतरत्या पायरीस लागणे** – ऱ्हास होत जाणे
**उतू जाणे** – अती होणे, नाशक होणे
**उत्तेजन देणे** – प्रोत्साहन देणे, पाठींबा देणे
**उदक सोडणे** – त्याग करणे, एखाद्या गोष्टीचा नाद सोडणे
**उदरी शनी येणे** – अचानक द्रव्यलाभ होणे
**उदो उदो करणे** – प्रशंसा करणे
**उद्धार करणे** – शिव्या देणे, वाईट स्थितीतून चांगल्या स्थितीत आणणे.
**उधाण येणे** – भरती येणे, ओसंडून वाहणे.
**उन्मळून पडणे** – मुळासकट कोसळणे, निराश होणे.
**उन्हाची लाही फुटणे** – अतिशय कडक ऊन पडणे.
**उपमर्द करणे** – अपमान करणे.
**उपपावन करणे** – बाजू मांडणे.
**उपर करणे** – मदत करणे.
**उपर ठेवणे** – वरचष्मा राखणे.
**उपसर्ग होणे** – त्रास होणे.
**उपार्जन करणे** – खर्चावयास देणे.
**उपासमार होणे** – खायला अन्न न मिळणे.
**उभे जाळणे** – फार छळणे.
**उभा इंद्र करणे** – एखाद्या कामाला पुन्हा नव्याने सुरुवात करणे.
**उभा दावा करणे** – कायमचे वैर करणे.
**उभे धरणे** – कडक शिस्त लावणे.
**उमाळा येणे** – गहिवरून येणे; मायेची भावना उचंबळून येणे.
**उरात धडकी भरणे** – **अतिशय घाबरणे**

• **ओटी पसरणे**

भिक्षेसाठी तिने **ओटी पसरली.**

• **ओठ सुकणे**

उन्हात फिरून फिरून रेवाचे **ओठ सुकले.**

• **ओठाबाहेर काढणे**

संध्याने आपली नाराजी **ओठाबाहेर काढली.**

• **ओढून ताणून चंद्रबळ आणणे**

लग्नाचा खर्च राजीवला खरंतर जडच होता. मात्र, त्याने **ओढून ताणून चंद्रबळ** आणले.

• **ओमफस होणे**

माझा पहिल्यांदाच पुरणपोळी करण्याचा प्रयत्न **ओमफस झाला.**

• **ओलीसुकी करणे**

सरपंचांनी सर्वप्रथम **ओलीसुकी करून** मगच निर्णय दिला.

• **ओले कोरडे खाणे**

संघर्षाच्या काळात रमेशला अनेक दिवस **ओले कोरडे खावे लागे.**

• **ओहोटी लागणे**

मालिका बंद झाल्यापासून अभिनेत्याच्या प्रसिद्धीस **ओहोटी लागली.**

## औ

**औषध नसणे** – उपाय नसणे.

**औषधालाही नसणे** – मुळीच नसणे, उपाय नसणे.

**औषधावाचून खोकला/खरूज जाणे** – आपोआप संकट टळणे.

### – वाक्यात उपयोग –

• **औषधावाचून खोकला जाणे**

भांडखोर शेजाऱ्याची बदली झाल्याने अमितला **औषधावाचून खोकला** गेला असेच वाटले.

• **औषध नसणे**

तिच्या रागीट स्वभावाला **औषध नाही.**

## क

**कंकण हाती बांधणे** – एखादे काम करण्याची प्रतिज्ञा करणे.

**कंठशोष करणे** – ओरडून गळा सुकविणे.

**कंठस्नान घालणे** – शिर धडावेगळे करणे, मारणे.

**कंबर कसणे** – हिंमत दाखविणे.

**कंबर खचणे/बसणे** – निराश होणे, धीर सुटणे.

**कंठ दाटणे** – सद्गदित होणे.

**कंठ फुटणे** – अचानक बोलू लागणे.

**कंठी प्राण उरणे** – आसन्नमरण होणे.

**कंठी प्राण येणे** – भयाने घाबरगुंडी वळणे, दुःखाने किंवा भुकेने व्याकुळ होणे.

**कंबर बांधणे** – कोणत्याही कामाला सिद्ध होणे.

**कंबरेचे सोडून डोक्यास गुंडाळणे** – लाज सोडणे.

**कष्टी होणे** – अत्यंत दुःख होणे.

**कच खाणे** – माघार घेणे.

**कच्चे मडके** – अप्रगल्भ माणूस.

**कच्छपी लागणे** – स्वकार्यासाठी, स्वार्थासाठी एखाद्याच्या मागे लागणे.

**कटासन घालून बसणे** – तपश्चर्या करणे; तपश्चर्येचे ढोंग करणे.

**कडी करणे** – स्पर्धा करून श्रेष्ठत्व मिळविणे, सरशी होणे.

**कडेलोट होणे** – पराकाष्ठा होणे.

**कढ काढून रडणे** – जोरजोराने रडणे.

**कढ येणे** – उमाळा येणे, गहिवर येणे.

**कढी पातळ होणे** – खूप घाबरणे.

**कणीक तिंबणे** – मार देणे.

**कणीस जाणे** – मरणे.

**कपाळ उठणे/चढणे** – उपद्रव होणे, त्रास होणे.

**कपाळ पांढरे होणे** – वैधव्य प्राप्त होणे.

**कान फुंकणे/भरणे** – मन कलुषित करणे.
**कान लांब होणे** – अक्कल कमी होणे, चौकसपणा दाखवणे.
**कानउघडणी करणे** – खरडपट्टी काढणे, कडक शब्दांत चुकीची जाणीव करून देणे.
**कानमंत्र देणे** – गुप्त सूचना देणे, चिथावणी देणे.
**कानाचा हलका** – दुसऱ्याच्या चहाड्यांनी मन दूषित करून घेणारा.
**कानामागे टाकणे** – झिडकारणे, दुर्लक्ष करणे, या कानाने ऐकून त्या कानाने सोडून देणे, जणू ऐकलेच नाही असे दाखवणे.
**कानाला खडा लावणे** – पुन्हा एखादी चूक न करण्याचा निश्चय करणे, धडा घेणे.
**कानाडोळा करणे** – दुर्लक्ष करणे.
**कानात तेल घालून निजणे** – पूर्णपणे दुर्लक्ष करणे.
**कानामागून येऊन तिखट होणे** – मागाहून येऊन वरचढ होणे.
**कानामागे टाकणे** – दुर्लक्ष करणे.
**कानाला चावा घेणे** – नको त्या गोष्टी सांगून दुसऱ्याचे मन कलुषित करणे.
**कानावर घालणे** – कळविणे, निवेदणे.
**कानावर पडणे** – सहज ऐकू येणे.
**कानावर हात ठेवणे** – ऐनवेळी जबादारी टाळणे, माहीत नसल्याचा बहाणा करणे, अज्ञान प्रकट करणे, नाकारणे.
**कानीकपाळी ओरडणे** – सतत उपदेश करून वस्तुस्थिती नजरेस आणणे.
**कानोसा घेणे** – चाहूल घेणे, एकाग्रतेने ऐकणे.
**कायापालट होणे** – संपूर्ण बदल होणे.
**कालवाकालव होणे** – चिंतेने किंवा भीतीने पोटात कसेतरी होणे, मनाची चलबिचल होणे.
**कालवश होणे** – मरण पावणे.
**कावरेबावरे होणे** – बावरणे.
**कास धरणे** – आधार घेणे.
**काहूर माजणे** – विचार वा भावनांचा गोंधळ होणे.
**काळजाचा लचका तुटणे** – मन अत्यंत व्यथित होणे.
**काळजाचे कोळसे होणे** – सर्व इच्छा, उमेद नष्ट होणे.
**काळजाचे पाणी होणे** – दुःखग्रस्त होणे, घाबरणे.
**काळजाला घर पडणे** – कटू बोलण्याने मनाला वेदना होणे, ह्रदयाला झोंबणे, जिव्हारी लागणे.
**काळजाला झोंबणे** – कटू बोल मनाला लागणे.
**काळधर्म जाणे** – मरणे.
**काळाच्या उदरात गडप होणे** – नष्ट होणे; नाश पावणे.
**काळावर नजर ठेवणे** – बदलत्या परिस्थितीचा अंदाज घेणे.
**काळाक्षरी नाव घालणे** – ताम्रपटात किंवा शिलालेखात ज्यास वृत्ती दिली त्याचा उल्लेख करणे.
**काळे करणे** – निघून जाणे/चालते होणे, फरार होणे, परागंदा होणे.
**कामातून जाणे** – निरुपयोगी होणे.
**काळीज फाटणे** – भीतीने थरकाप उडणे.
**काळझोप घेणे** – मरण येणे.
**कान टवकारून ऐकणे** – लक्ष देऊन ऐकणे.
**कामगिरी बजावणे** – एखादे काम पूर्ण करणे.
**कालिमा लावणे** – वाईट कामामुळे अपकीर्ती होणे.
**कामास येणे** – उपयोगी पडणे.
**काडीने औषध लावणे** – वरवर काम केल्याचे दाखविणे.
**किंतू येणे** – संशय येणे.
**किल्ली फिरविणे** – एखाद्याच्या मनातील विचार पालटविणे.
**कीस काढणे** – फाजील चिकित्सा करणे, खूप चर्चा करणे.
**कुंकू पुसणे** – वैधव्य प्राप्त होणे.

**गगन ठेंगणे होणे** – अतिशय आनंद होणे.
**'ग'ची बाधा होणे** – गर्वाने फुगून जाणे.
**गट्ट करणे** – १. खाऊन टाकणे २. बळकावणे.
**गट्टी फू करणे** – सहवास सोडून देणे.
**गदगदून येणे** – अंतःकरण भरून येणे.
**गत्यंतर नसणे** – इलाज नसणे.
**गमजा करणे** – वेडेवाकडे चाळे करणे.
**गम्य असणे** – समजण्यासारखे असणे.
**गय करणे** – क्षमा करणे.
**गर्भगळीत होणे** – अतिशय घाबरणे.
**ग्रहण सुटणे** – काळजी नाहीशी होणे.
**गरुड नजर असणे** – दृष्टी अतिशय तीक्ष्ण असणे.
**गलबलून येणे** – १. अतिशय कळवळा येणे २. गहिवरणे.
**गलितगात्र होणे** – १. अतिशय थकवा येणे. २. शरीरात त्राण न राहणे.
**गवगवा होणे** – १. बोभाटा होणे २. सर्वांना माहीत होणे ३. प्रसिद्धी होणे.
**गहजब करणे** – १. जुलूम करणे २. फार बोभाटा करणे.
**गळ टाकून पाहणे** – प्रयत्न करणे, खडा टाकून पाहणे.
**गळा गोवणे** – पेचात अडकविणे.
**गळा मोकळा करणे** – संकटातून सुटका करणे.
**गळ्यात पडणे** – नाइलाजाने एखादे काम करावे लागणे.
**गळ्यात माळ घालणे** – महत्त्वाचे काम सोपविणे.
**गळ्यातील ताईत होणे** – अतिशय प्रिय होणे.
**गळ्याला तात लागणे** – प्राणघातक संकटात सापडणे.
**गळ्याशी येणे** – नुकसान होणे.
**गाठी घालणे** – मतलबापुरते पाहणे.
**गाठीस बांधणे** – शिल्लक ठेवणे.

**गाढवाचा नांगर फिरणे** – समूळ नायनाट करणे.
**गाढवे राखणे** – काही काम नसणे.
**गाय होणे** – रंजीस येणे.
**गाई पाण्यावर येणे** – डोळ्यातून अश्रुधारा येऊन रडू कोसळणे.
**गाठीस असणे** – शिलकेत असणे.
**गावचेच नसणे** – संबंध नसल्याचे दाखविणे.
**गाडी वळणावर येणे** – काम सुरळीत मार्गी लागणे
**गाल फुगविणे** – रुसणे.
**ग्वाही देणे** – साक्ष देणे, खात्री देणे.
**गालात हसणे** – मंदस्मित करणे.
**गाऱ्हाणे वेशीपुढे टांगणे** – अन्याय सर्वांच्या नजरेस आणणे.
**गाळण उडणे** – घाबरगुंडी वळणे.
**गाशा गुंडाळणे** – निघून जाण्याच्या उद्देशाने आवराआवर करणे.
**गाठ पडणे** – भेट होणे (न ठरवता).
**गावी नसणे** – खिजगणतीत नसणे, ठाऊक नसणे, बिलकूल माहीत नसणे.
**गिळंकृत करणे** – लबाडीने अपहरण करणे.
**गिल्ला करणे** – गोंधळ उडविणे.
**गुरूमंत्र देणे** – लबाडीचा सल्ला देणे.
**गुलदस्त्यात ठेवणे** – लपवून ठेवणे; गुप्त ठेवणे.
**गुळखोबरे देणे** – लाच देणे.
**गुळणी धरून बसणे** – गप्प बसणे.
**गुळणी फोडणे** – स्पष्ट शब्दांत सांगणे.
**गुळाचा गणपती** – जड व आळशी माणूस.
**गुळाचा गणपती असणे** – अंगात कसलेही कर्तृत्व नसणे.
**गुंगारा देणे** – फसवून पळून जाणे.
**गुण उधळणे/पाजळणे** – दुर्गुण दाखविणे.
**गुजराण करणे** – निर्वाह करणे.
**गुण्यागोविंदाने** – शांततेने, न भांडता–सवरता.

## च

**चंचुप्रवेश होणे** - शिरकाव होणे
**चंग बांधणे** - निश्चय करणे, निर्धार करणे, प्रतिज्ञा करणे
**चंदन करणे** - नाश करणे
**चंबूगबाळे आटोपणे** - सामानाची आवराआवर करणे, गुपचूप निघून जाणे
**चर्वितचर्वण करणे** - त्याच त्याच विषयावर सतत चर्चा करणे
**चटणी करणे** - नष्ट करणे
**चकित करणे** - आश्चर्य वाटेल असे करणे
**चटका बसणे** - फार दुःख होणे
**चाहूल लागणे** - कोणीतरी आहे, असे वाटणे
**चलबिचल सुरू होणे** - अस्वस्थ वाटणे
**चकाट्या पिटणे** - रिकाम्या गप्पा मारीत राहणे
**चकार शब्द न काढणे** - काहीही न बोलणे
**चक्री गुंग होणे** - मती न चालणे
**चक्री उडविणे** - फजिती करणे
**चतुर्भुज होणे** - लग्न होणे; कैद होणे
**चऱ्हाट वळणे** - कंटाळवाणे कथन करणे
**चव्हाट्यावर आणणे** - उघडकीस आणणे
**चष्म्यातून पाहणे** - विशिष्ट दृष्टिकोनातून बघणे
**चांदी उडणे** - नाश होणे
**चाकोरीतून जाणे** - ठरावीक व परंपरागत मार्गाने जाणे
**चाड न वाटणे** - बेपर्वा होणे, लाजलज्जा न वाटणे
**चार हात होणे** - लग्न होणे, मारामारी होणे
**चालत्या गाडीला खीळ घालणे** - व्यवस्थित चालेल्या कार्यात अडथळे आणणे
**चाह असणे** - आवड असणे
**चहा करणे** - वाहवा करणे, स्तुती करणे.
**चारी मुंड्या चीत करणे** - पूर्णपणे पराभव करणे
**चार हात दूर असणे** - संबंध न ठेवणे
**चालत्या गाड्याला खीळ घालणे** - सुरळीत चाललेल्या कामात विघ्न आणणे
**चाळा लागणे** - नाद / छंद लागणे
**चारी दिशा मोकळ्या होणे** - पूर्ण मोकळीक असणे
**चालता बोलता** - मूर्तिमंत
**चिटपाखरू नसणे** - एकदम शांतता असणे
**चिरीमिरी देणे** - लाच देणे
**चीज होणे** - सफलता होणे, सार्थक होणे
**चीतपट होणे** - पूर्ण पराभव होणे
**चुटक्यांचे मांडव** - बढाईखोरीने बोलणे
**चुलीला अक्षता देणे** - जेवणासाठी सहकुटुंबास आग्रहाचे निमंत्रण देणे, चूलबंद आमंत्रण देणे
**चुकल्यासारखे होणे** - अस्वस्थता येणे
**चुरमुरे खात बसणे** - खजील होणे, पदरी न पडणे
**चुटपुट लागणे** - हुरहुर लागणे, अस्वस्थ वाटणे
**चूर होणे** - दंग होणे, निमग्न होणे
**चेहरा काळवंडणे** - मन खिन्न होणे
**चेहरा पडणे** - निराश होणे
**चेहरा खुलणे** - आनंद वाटणे
**चोरावर मोर होणे** - चोराचीच वस्तू चोरणे; सवाई चोर होणे
**चौखूर उधळणे** - वाट सापडली तिकडे पळत सुटणे; स्वैर होणे
**चौदावे रत्न दाखविणे** - खूप मार देणे

### - वाक्यात उपयोग -

- **चर्वितचर्वण करणे**
  एखाद्या समस्येवर **चर्वितचर्वण करण्यापेक्षा** त्या उपाय शोधणे गरजेचे आहे.
- **चव्हाट्यावर आणणे**
  वेगवेगळे घोटाळे **चव्हाट्यावर आणणे** हे माध्यमा काम आहे.

**जिवात जीव येणे** – काळजी नाहीशी होणे

**जिवावर उठणे** – एखाद्याचा जीव घ्यायला तयार होणे

**जिवावर बेतणे** – फार मोठे संकट ओढवणे

**जिभेला हाड नसणे** – जिभेवर नियंत्रण नसणे, बेजबाबदारपणे वाटेल ते बोलणे

**जिवास जीव देणे** – अत्यंत काळजीपूर्वक एखाद्याला जपणे

**जिवाला घोर लागणे** – खूप काळजी वाटणे

**जिवापाड जपणे** – मायेने सांभाळणे

**जिवाचा कान करून ऐकणे** – नीट लक्ष देऊन ऐकणे

**जिवापाड कष्ट करणे** – अतिशय कष्ट करणे

**जिवाला घोर आणणे** – खूप काळजी वाटणे

**जिवावर उदार होणे** – प्राण देण्यास तयार होणे

**जिवाचा धडा करणे** – साहसाला तयार होणे

**जिवावर येणे** – नकोसे वाटणे, अप्रिय वाटणे

**जीभ चावणे** – चपापणे; संकोचाने दबत–दबत बोलणे

**जीभ लांब करून बोलणे** – मर्यादा सोडून बोलणे

**जीभ विटाळणे** – वाईट शब्द बोलणे

**जीव अधीर होणे** – अतिशय उतावीळ होणे

**जीव अर्धा होणे** – अतिशय दमणे

**जीव कानात गोळा होणे** – अतिशय उत्सुकतेने व आत्मीयतेने ऐकणे

**जीव खाली पडणे** – काळजीतून मुक्त होणे

**जीव गहाण ठेवणे** – कुठल्याही त्यागास तयार होणे

**जीव टांगणीस लागणे** – चिंता वाटणे

**जीव टाकणे** – अतिशय धडपड करणे

**जीव टेकीस येणे** – खूप कष्ट केल्याने पार थकून जाणे

**जीव तीळ–तीळ तुटणे** – खूप तळमळ वाटणे

**जीव थोडा–थोडा होणे** – धाकधूक वाटणे; चिंता वाटणे

**जीव पाखडणे** – महत्प्रयासाने एखादी गोष्ट साध्य करणे

**जीव भांड्यात पडणे** – काळजी नाहीशी होणे

**जीव मातीत घालणे** – खूप कष्ट करणे

**जीव मुठीत धरणे** – मन घट्ट करणे

**जीव मेटाकुटीस येणे** – वैतागून जाणे

**जीव लावणे** – लळा लावणे, माया लावणे

**जीव खालीवर होणे** – खूप काळजी वाटणे

**जीवदान देणे** – वाचविणे

**जीव ओतणे** – मनापासून काम करणे

**जीव नकोसा होणे** – अतिशय त्रासून जाणे

**जीव घेणे/खाणे** – सतावणे, छळणे

**जीव की प्राण असणे** – प्राणाइतके प्रिय असणे

**जीव घेऊन पळणे** – जीव वाचवण्यासाठी पळत सुटणे

**जीव थाऱ्यावर नसणे** – चिंताग्रस्त असणे

**जीव धरणे** – (रोप / बी) रुजणे, वाढीस लागणे

**जीवश्च कंठश्च** – जीव आणि कंठ यांच्यासारखी दाट मैत्री, अतिशय सख्य

**जेरीस आणणे** – हैराण करणे, शरण यायला भाग पाडणे.

**जोखडात अडकविणे** – बंधनात अडकविणे; बांधून ठेवणे

**जो जो करणे** – बाळाला झोपविणे

**जोडे फाटणे/झिजवणे** – खेटे घालणे/नाहक ये–जा करणे

**जोपासना करणे** – संगोपन करणे

### – वाक्यात उपयोग –

- **जंग जंग पछाडणे**

इंग्रज सैनिकांनी **जंग जंग पछाडूनही** गावकऱ्यांनी क्रांतिकारकांची माहिती त्यांना दिली नाही.

- वाक्यात उपयोग -

• झुलत ठेवणे

काम देतो असे सांगून निर्मात्याने अनेक नवोदित अभिनेत्यांना **झुलत ठेवले.**

• झोप उडणे

परीक्षा जवळ आल्याने विद्यार्थ्यांची पार **झोप उडाली.**

• झाकलं माणिक असणे

आमची सुरेखा म्हणजे **झाकलं माणिक आहे.** अबोल, पण कामात अतिशय हुशार

• झुरणीला लागणे

मुलाच्या अकाली मृत्यूमुळे सदाशिव **झुरणीला लागला.**

• झुंबड उडणे

टँकर गावात येताच पाणी भरण्यासाठी एकच **झुंबड उडाली.**

• झक मारणे

**झक मारली** आणि त्या लुच्च्या माणसावर विश्वास ठेवला.

• झुंजूमुंजू होणे

**झुंजूमुंजू झालं** आणि पाखरांची किलबिल वाढली.

• झेंडा फडकवणे

आपल्या हुशारीमुळे अमितने परदेशात **झेंडा फडकवला.**

• झोपेत असणे

कंपनीत एवढा गैरव्यवहार होताना तू **झोपेत होतास** का?

## ट

**टंगळमंगळ करणे** – टाळाटाळ करणे, हयगय करणे

**टक्केटोणपे खाणे** – चांगल्या–वाईट अनुभवांनी शहाणे होणे; ठेच खाणे

**टक लावून पाहणे** – बारीक नजरेने एकसारखे पाहणे

**टकमका बघणे** – एकसारखे लक्ष देऊन पाहणे

**ट फ करणे** – अक्षर ओळख होणे

**टाकीचे घाव सोसणे** – त्रास सहन करणे

**टाके ढिले होणे** – १. खूप कष्ट पडणे २.भेदरणे

**टाचा घासणे** – मरतांना पाय झाडणे; फडफडणे

**टाळूवरचे लोणी खाणे** – वाईट मार्गाने स्वार्थ साधणे

**टाळूवर हात फिरविणे** – आपलेपणा दाखवून फसविणे; विश्वासघात करणे

**टाहो फोडणे** – मोठ्याने रडणे, आक्रोश करणे

**टिक्की लावणे** – आपली सोय करून घेणे

**टिनपट वाजणे** – पैसा निघून जाणे

**टिमकी वाजविणे** – उदो उदो करणे; बढाई मारणे

**टिवल्याबावल्या करणे** – टवाळकी करीत फिरणे, उनाडक्या करणे

**टेंभा मिरविणे** – ऐट दाखविणे

**टेकीस येणे** – अगदी दमून जाणे

**टेकू देणे** – पाठिंबा देणे

**टोळका घेणे** – ध्यास घेणे

– वाक्यात उपयोग –

• टाळूवरचे लोणी खाणे

शेतकऱ्यांच्या आणि कर्ज घेतलेल्या गरीबांच्या **टाळूवरचे लोणी खाऊन** सावकार चांगलाच श्रीमंत झाला होता.

• टिमकी वाजविणे

स्वतःची सतत **टिमकी वाजविणाऱ्या** रमेशने प्रत्यक्ष काम करण्याची वेळ येताच पळ काढला.

• टंगळमंगळ करणे

गणितासारख्या नावडत्या विषयाचा अभ्यास करताना आदेश कायम **टंगळमंगळ करायचा.**

**डांगोरा पिटणे** – जाहीर करणे

**डाळ शिजणे** – थारा मिळणे, दाद लागणे, दखल घेतली जाणे

**डाव पडणे** – पराभव होणे, हारणे

**डाव साधणे** – संधीचा फायदा घेणे

**डावे-उजवे करणे** – पक्षपात करणे

**डाळ न शिजणे** – काहीही इलाज न चालणे

**डिंग मारणे** – बढाई मारणे

**डेरेदाखल होणे** – मुक्कामाला पोहोचणे

**डोंगर पोखरून उंदीर काढणे** – मोठ्या प्रमाणावर आरंभ करून शेवटी अत्यल्प कर्तबगारी दाखवणे

**डोईवर शेकणे** – नुकसान होणे

**डोक्यावरून पाणी जाणे** – न समजणे

**डोक्यावरून पाणी फिरणे** – निराधार होणे; लाचार होणे; कळस होणे

**डोक्यावर बसविणे** – फाजील मान देणे, फाजील लाड करणे

**डोक्यावर मिऱ्या वाटणे** – डोक्यावर बसणे, वरचढ होणे

**डोके खाजविणे** – युक्ती शोधणे, विचार करून मार्ग शोधणे

**डोके टेकणे** – विश्रांती घेणे; खूप निराश होणे

**डोके देणे** – धीराने तोंड देणे

**डोके धरून बसणे** – काम साधण्यासाठी एखाद्याचा पिच्छा पुरविणे; खूप विचार करणे

**डोकेफोड करणे** – त्रस्त होईपर्यंत समजावून सांगणे

**डोळा चुकविणे** – भेट घेण्याचे टाळणे

**डोळा ठेवणे** – अभिलाषा धरणे

**डोळ्यांच्या खाचा होणे** – आंधळे होणे

**डोळ्याखालून घालणे** – निरीक्षण करणे

**डोळ्याचे पारणे फिटणे** – नेत्रसुख घेऊन समाधान होणे

**डोळ्यात खुपणे** – एखाद्याचे भले झालेले सहन न होणे

**डोळ्यात प्राण आणणे** – अतिशय आतुर होणे

**डोळ्यात सलणे** – मत्सर वाटणे

**डोळ्यातील काजळ चोरणे** – अतिशय कौशल्याने चोरी करणे

**डोळ्यावर कातडे ओढणे** – जाणूनबुजून दुर्लक्ष करणे

**डोळ्यावर धूर येणे** – सत्तेचा अगर संपत्तीचा गर्व होणे

**डोळ्यावर येणे** – मत्सर निर्माण होणे

**डोळ्यास डोळा लागणे** – झोप येणे

**डोळे उघडणे** – सत्य स्थितीची जाणीव होणे

**डोळे निवणे** – समाधान वाटणे

**डोळे पांढरे करणे** – मरायला टेकणे; अतिशय भीती वाटणे

**डोळे फिरणे** – १. चक्कर येणे; २. आश्चर्यचकित होणे; ३.द्रव्याने किंवा अधिकाराने अंगी मगुरी येणे

**डोळे भरून येणे** – गहिवरून येणे

**डोळे मोडणे** – डोळ्याने खाणाखुणा करणे

**डोळे विस्फारून पाहणे** – आश्चर्याने पाहणे

**डोके उठणे** – डोके दुखू लागणे

**डोक्यावर खापर फोडणे** – दोष माथी मारणे

**डोक्यावर चढणे** – एखाद्याला न जुमानणे

**डोक्यात राख घालणे** – संतापणे

**डोळा लागणे** – थोडीशी झोप येणे, डुलकी काढणे

**डोळे दिपवणे** – आश्चर्यचकित करणे

**डोळ्यांत भरणे** – अत्यंत आवडणे, महत्त्वाचा वाटणे

**डोळ्यात तेल घालणे** – अतिशय काळजीपूर्वक काम करणे

**डोळ्यात तेल घालून पाहणे** – जागृतीने किंवा दक्षतेने पाहणे

**डोळ्यांत धूळ फेकणे** – फसविणे

**डोळ्यावर कातडे ओढणे** – एखाद्या गोष्टीकडे

दिसतात.

• **थोबाड रंगवणे**

चोरी केल्याचे कबूल केल्यावर सुधाकरच्या बाबांनी त्याचे **थोबाड रंगवले.**

## द

**दंड थोपटणे** – सामना करण्यास उद्युक्त होणे

**दंडाला माती लावणे** – कुस्तीसाठी तयार होणे

**दगडाला पाझर फुटणे** – निर्दय माणसाच्या अंत:करणात दया उत्पन्न होणे

**दगडावरची रेघ** – खोटे न ठरणारे शब्द किंवा भाकीत

**दहीखाऊ महीखाऊ होणे** – शंकित होणे, अनिश्चितता वाटणे

**दम खाणे** – शांतता पाळणे, धीर धरणे

**दगाबाजी करणे** – विश्वासघात करणे, फितुरी करणे

**दशा होणे** – विपन्नावस्था येणे

**दम धरणे** – धीर धरणे

**दबा धरून बसणे** – आडबाजूला लपून बसणे

**दत्त म्हणून उभे राहणे** – अचानक उपस्थित होणे

**दगडाखालून हात काढून घेणे** – मोठ्या जबाबदारीतून निसटून जाणे

**दगडाखाली हात सापडणे** – मोठ्या अडचणीत येणे

**दगडाला शेंदूर फासणे** – एखाद्याला अकारण मोठेपणा देऊन त्याचे महत्त्व वाढविणे

**दगड टाकून ठाव पाहणे** – काही यत्न करून एखाद्या गोष्टीचा अंदाज घेणे

**दगडाचा दोर करणे** – अशक्य गोष्ट शक्य करण्याचा प्रयत्न करणे

**दम देणे** – दहशत घालणे

**दम टाकणे** – धैर्य सोडणे

**दात कोरून पोट भरणे** – भलतीच काटकसर करणे

**दात घशात घालणे** – फजिती करणे

**दादापुता करणे** – गोड बोलून मन वळविणे

**दाढी धरणे** – विनवण्या करणे

**दाणे टाकून कोंबडे झुंजविणे** – मुद्दाम पदरचे खर्चून भांडण लावणे

**दात पाडणे** – निरुत्तर करणे, फजिती करणे

**दात विचकणे** – याचना करणे, वेडावून दाखवणे

**दातांच्या कण्या करणे** – सतत उपदेश करणे

**दातांवर मांस नसणे** – गरिबीने त्रासून जाणे

**दाती तृण धरणे** – पराजय कबूल करणे, शरण येणे

**दाद मागणे** – न्याय मागणे

**दाद देणे** – प्रतिसाद देणे, प्रशंसा करणे

**दाद न देणे** – दुर्लक्ष करणे, दखल न घेणे

**दाढेत सापडणे** – तावडीत सापडणे

**दात खट्टे करणे** – पराभव करणे

**दात वाजविणे** – खाण्यासाठी आतुर होणे

**दाती बळ धरणे** – अतोनात मेहनत करणे

**दावा उगवणे** – दिलेल्या अपकाराचा सूड उगवणे

**दारात हत्ती झुलणे** – अतिशय श्रीमंत असणे

**द्राविडी प्राणायाम करणे** – साध्या सरळ बाबींसाठी गुंतागुंतीचे प्रयत्न करणे

**दात धरणे** – द्वेष करणे

**दातखिळी बसणे** – भीतीने बोलणे अवघड होणे

**दातास दात लावून बसणे** – काही न खाता उपाशी राहणे

**दात ओठ खाणे** – चरफडणे

**दिग्विजय करणे** – चहुदिशांनी विजय मिळविणे

**दिग्विजय मांडणे** – आक्रस्ताळेपणा करणे, आडदांडपणा करणे

**दिग्मूढ होणे** – काय करावे ते न सुचणे

- **भारून टाकणे**

महात्मा गांधींच्या आचार विचारांनी भारतच काय जगभरातील अनेकांना **भारून टाकले** होते.

- **भान विसरणे / हरपणे**

आंजर्ल्याच्या सुरेख समुद्रकिनाऱ्यावरून सूर्यास्ताचे मनोहारी दृश्य पाहून ती दोघे **भान विसरली** / त्या दोघांचे **भान हरपले.**

- **भीक न घालणे**

गुप्तहेराने शत्रूच्या कुठल्याही प्रलोभनांना, धमक्यांना **भीक घातली नाही** आणि आपले काम चोख बजावले.

## म

**मंगळ गात बसणे** – दुःख करीत बसणे

**मधाचे बोट लावणे** – लालूच दाखविणे, आशा दाखविणे

**मक्ता असणे** – एकाधिकार असणे

**मनगटावर केस येणे** – मनगटातला जोर नाहीसा होणे

**मनातील अढी** – मनातील कटुता

**मन खाणे** – मनाला टोचणी लागणे

**मगजमारी करणे** – डोक्याला निष्कारण शीण देणे

**मन पालवणे** – मन प्रफुल्लित होणे

**मनात मांडे खाणे** – अशक्य अशा कल्पना करीत बसणे

**मनाला इंगळ्या डसणे** – मनाला भयंकर त्रास होणे

**मनोराज्य करणे** – अशक्य कल्पनांत गुंतून राहणे

**मशागत करणे** – काळजीपूर्वक मेहनत करणे

**मन घालणे** – मनापासून लक्ष देणे

**मनात घर करणे** – मनात कायम राहणे

**मन उडणे/उतरणे** – आवडेनासा होणे, मन विटणे

**मन मोठे करणे** – उदारपणा दाखविणे

**मन मोडणे** – इच्छेविरुद्ध वागणे

**मनावर घेणे** – मनात पक्का विचार करणे

**महाभारत घडणे** – बरीच गुंतागुंतीची गोष्ट घडणे, मोठा कलह उत्पन्न होणे

**मन बसणे** – फार आवडणे

**मट्ट करणे** – खाऊन टाकणे

**मनात भरणे** – पसंत पडणे

**मन खाणे** – मनाला टोचणी लागणे

**मन द्विधा होणे** – हे करू की ते, काहीच न सुचणे

**मन खट्टू होणे** – नाराज होणे

**मन साशंक होणे** – संशय वाटणे

**मनाशी खूणगाठ बांधणे** – पक्का विचार करणे

**मधून विस्तव न जाणे** – अत्यंत वैर असणे

**मांजराच्या गळ्यात घंटा बांधणे** – अशक्य गोष्ट करू पाहणे

**मांडलिक होणे** – छोट्या राज्याच्या राजाने मोठ्या राजाच्या अधीन राहणे

**मामा बनविणे** – फसविणे

**मागमूस नसणे** – ठावठिकाणा न सापडणे

**मागोवा घेणे** – तपास करणे

**मात्रा लागू पडणे** – उपाय बरोबर ठरणे

**माया पातळ होणे** – प्रेम कमी होणे

**मात्रा वर असणे** – वरचढ असणे

**मानगुटीस बसणे** – अगदी पिच्छा पुरविणे, अति गळ घालणे, भुताने पछाडणे

**माती कालविणे** – एखाद्याच्या उदरनिर्वाहाचे साधन नष्ट करणे

**माधुकरी मागणे** – घरोघरी जाऊन शिजल्या अन्नाची भिक्षा मागणे

**मायेचा पूत** – कर्तबगार व पराक्रमी माणूस

**मानखंडना करणे** – अपमान करणे

**मान तुकविणे** – नाइलाजाने कबूल करावे लागणे

**मात करणे** – कुरघोडी करणे, वरचढ होणे

**मान ताठ ठेवणे** – स्वाभिमानाने जगणे

## व

**वनवास भोगणे** – हालअपेष्टा सहन करणे

**वडाची साल पिंपळाला लावणे** – नसता संबंध जोडणे

**वहिवाट असणे** – पूर्वापारपासूनची पद्धत असणे, रीत असणे

**वर्दळीवर येणे** – भांडणास तयार होणे

**वचपा काढणे** – बदला घेणे; सूड उगवणे

**व्यथित होणे** – दुःखी होणे

**व्रतवैकल्ये करणे** – देवधर्म करीत राहणे

**वर्ज्य करणे** – टाळणे

**वड्याचे तेल वांग्यावर काढणे** – एकावरचा राग दुसऱ्यावर काढणे

**वठणीवर आणणे** – ताळ्यावर आणणे

**वणवण करीत हिंडणे** – फार श्रम करीत हिंडणे

**वकिली करणे** – बाजू घेणे

**वज्रलेप होणे** – अगदी पक्के होणे, न बदलणे

**वश होणे** – ताब्यात जाणे

**वरवंटा फिरविणे** – नाश करणे

**वयात येणे** – तारुण्याच्या भरात येणे, समजू लागणे

**व्यासंग असणे** – विषयाचा गाढा अभ्यास असणे

**व्यूह रचणे** – सापळा तयार करणे

**व्यग्र होणे** – मग्न होणे

**वाऱ्याची मोट बांधणे** – अशक्य गोष्ट करू पाहणे

**वाचा विटाळणे** – खोटे बोलणे

**वाघाचे कातडे पांघरणे** – शक्तीचा पोकळ देखावा करणे

**वाट मारणे** – वाटेत गाठून लुबाडणे

**वाण पडणे** – कमतरता भासणे

**वाताहत होणे** – नाश करून टाकणे

**वाऱ्याला न फिरकणे** – पूर्णपणे संबंध तोडून टाकणे

**वावड्या उठणे** – खोट्या गोष्टींचा प्रसार होणे

**वास्तपुस्त करणे** – चौकशी करणे

**वारा वाहील तशी पाठ देणे** – परिस्थिती बदलेल त्याप्रमाणे वागणे

**वाहत्या गंगेत हात धुणे** – संधी येताच फायदा करून घेणे

**वाटाण्याच्या अक्षता लावणे** – स्पष्टपणे नाकारणे

**वाली नसणे** – रक्षण करणारा नसणे

**वाटोळे करणे** – नाश करणे

**वाकड्या नजरेने पाहणे** – वाईट हेतूने पाहणे

**वाचा बसणे** – बोलण्याची शक्ती नाहीशी होणे

**वाचा फुटणे** – बोलावयास लागणे

**वारा पिणे** – बेभान होणे

**वाकुल्या दाखविणे** – थट्टामस्करी करणे, वेडावणे

**वाकडे पाऊल पडणे** – दुर्वर्तन करणे

**वाखाणणी करणे** – स्तुती करणे, प्रशंसा करणे

**वाच्यता करणे** – बोभाटा करणे

**वाट लागणे** – नष्ट होणे, शिल्लक न राहणे

**वाटेस जाणे** – खोडी काढणे, चिडविणे

**वाटेस लावणे** – हाकलून देणे, निरोप देणे

**वारा पडणे** – वारा वाहावयाचा बंद होणे

**वाऱ्यावर सोडणे** – दुर्लक्ष करणे

**वाळीत टाकणे** – बहिष्कार घालणे, जातीबाहेर टाकणे

**वाघाची मावशी** – मांजर

**विधिनिषेध नसणे** – योग्य की अयोग्य याचा विचार न करणे

**विन्मुख होणे** – तोंड फिरविणे

**विकतचे श्राद्ध घेणे** – नसती कटकट मागे लावून घेणे

**विकासाची चक्रे फिरणे** – वेगाने विकास होऊ लागणे